MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १८ अंक : १ पाने : ८ डिसेंबर २०२२-जानेवारी २०२३ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :

प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

सीओपी-२०२६ मध्ये केंद्र शासनाने हवामानाशी संबंधित घटकांचा सामना करण्यासाठी पाच प्रमुख उद्दिष्ट्ये निर्धारित केली आहेत. यात २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अ-जीवाश्म (Non-fossil) ऊर्जा क्षमता गाठणे, २०३० पर्यंत नविकरणीय ऊर्जा अर्थात अक्षय ऊर्जेच्या माध्यमातून ५० टक्के ऊर्जेची आवश्यकता भागवणे, आतापासून २०३० पर्यंत एकूण अंदाजित कार्बन उत्सर्जन एक अब्ज टनांनी कमी करणे, २०३० पर्यंत अर्थव्यवस्थेची कार्बन तीव्रतेत ४५ टक्क्यांनी कपात करणे, २०७० पर्यंत शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य प्राप्त करणे यांचा समावेश आहे.

भारताच्या नविनीकरणीय ऊर्जा स्त्रोतांमध्ये प्रामुख्याने सौर आणि पवनऊर्जा यांचा समावेश होतो. या दोन्हीही स्त्रोतांव्दारे निर्माण होणारी ऊर्जा अनियमित स्वरूपाची असते. या प्रकारच्या ऊर्जेमध्ये बऱ्याचदा चढ-उतार होत असतो. ज्यामुळे ग्रिडच्या ऑपरेटरला वास्तविक संचलन (Real-time) करण्याच्या प्रक्रियेत बदल करण्यास भाग पाडले जाते आणि त्यांना कधी तासभर तर कधी-कधी दिवसभर संचलन पुढे मागे करावे लागते. या अनियमित ऊर्जेमुळे तालबध्दता बिघडते आणि गुणवत्तेवर परिणाम होतो. परिणामी, पारेषण नेटवर्कवर ताण पडतो.

- सर्वांसाठी दर्जेदार ऊर्जा
- ऊर्जेची गुणवत्ता सुनिश्चित करा
- सायबर सुरक्षेवर भर द्या
- ड्रोनमुळे कामात सुधारणा

केंद्र सरकारने निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार महाराष्ट्र शासनाने आपले नविकरणीय ऊर्जा धोरण घोषित केले आहे. यानुसार २०२५ पर्यंत २५ गिगावॅट ऊर्जा उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. आतापर्यंत अंदाजे १० गिगावॅट वीजनिर्मितीचे उद्दिष्ट शासनाने गाठले आहे. येत्या काही वर्षांत हा वाटा अतिरिक्त १५ गिगावॅटने वाढविणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे केंद्राचा हिस्साही वाढेल आणि या वाढीव वीजपुरवठ्याची पूर्तता करण्यासाठी सक्षम, समतुल्य प्रणाली अत्यंत गरजेची आहे. वीजनिर्मितीच्या ठिकाणापासून वीज भार केंद्रापर्यंत वीज पारेषित करण्यासाठी पुरेशा प्रणालीची गरज आहे. 'सर्वांसाठी दर्जेदार ऊर्जा' आता नवीन ब्रीद बनले आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करतानाच नवीन वीजनिर्मिती प्रकल्पांशी, पायाभूत सुविधांची जुळवाजुळव करण्याकरिता महापारेषण समोरील मुख्य आव्हाने म्हणजे प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे, प्रकल्प खर्च इष्टतम ठेवणे, प्रणालीचे आधुनिकीकरण, जुन्या होत असलेल्या मोठ्या प्रकल्पांची गुणवत्ता अबाधित राखणे, सायबर विश्वाच्या धोक्यांपासून ग्रिडचे संरक्षण करणे आणि पारेषण दर कमी करणे हे आहेत.

याबरोबर नुकसान कमी करणे, पारेषण प्रणालीची उच्चतम उपलब्धता आणि विश्वासार्हता अबाधित राखणे, राखीव ग्रिड मापदंडांसह ऊर्जेची गुणवत्ता सुनिश्चित करणे, सायबर सुरक्षा राखणे आणि ती भविष्यासाठी तयार करणे. ही या आधुनिक काळात पारेषण प्रणाली समोरील काही प्रमुख आव्हाने आहेत. व्यावहारिकदृष्ट्या महाराष्ट्रातील बहुतांश प्रकल्प हाती घेतल्यानंतर भूसंपादन, 'राईट ऑफ वे' म्हणजेच आर.ओ.डब्ल्यू. आणि वैधानिक मंजुरीच्या विलंबामुळे वेळ आणि खर्चात खूप वाढ झालेली आहे. यामुळे प्रकल्पाची किंमत वाढते आणि अप्रत्यक्षपणे त्याचा भार ग्राहकांवर पडतो. ही परिस्थिती भविष्यात टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांनी स्वतः मालक असल्याचे गृहित धरून काम करणे भाग आहे. यासाठी एक व्यावसायिक दृष्टिकोन निर्धारित करणे आवश्यक आहे की, ज्यामुळे 'लक्ष्य' साध्य करण्याच्या संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल. निर्णय घेणे म्हणजे काय, याची योग्यरित्या परिभाषा करणे आवश्यक आहे तसेच अधिकार ही जबाबदारीशी सुसंगत असले पाहिजेत. व्यावसायिक दृष्टिकोन राखून, व्याप्ती बदलणे टाळणे, बीओक्यू प्रमाणित करणे तसेच पुढे आरओडब्ल्यू कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी अधिका-यांनी महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या परिपत्रकाचे पालन करणे आवश्यक आहे. येणाऱ्या तिमाहीत अपूर्ण राहिलेले उद्दिष्ट अथवा 'स्पिल ओव्हर' कार्य पूर्ण करण्याची संधी आहे.

प्रणालीची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी प्राधान्यक्रम दिले जाते. हव्या असलेल्या क्रमाने उपलब्ध असलेल्या उपकरणांच्या देखभालीसाठी विविध पध्दतींचा अवलंब केला जातो. म्हणजे भविष्यसूचक देखभालीसाठी, सेन्सर्स/आधुनिक निदान चाचणी परिणामांकडील डेटाचा वापर करावा जेणेकरून देखभाल किंवा दुरुस्ती कधी आवश्यक आहे, हे समजेल. प्रतिबंधक देखभालीसाठी व नियोजित देखभाल (शेड्यूल मेंटेनन्स) करिता यंत्रसंचावरील अंदाजित वेळ /ओईएम शिफारीशी, प्रोएक्टिव्ह (सक्रिय) देखभालीसाठी समस्या निर्माण करणाऱ्या गोष्टी ओळखणे आणि त्याचे निराकरण करणे आणि प्रतिक्रियात्मक (Reactive) देखभालीसाठी; उपकरणे चालवावी आणि समस्या उद्भवते, तेव्हा त्याचे निराकरण करणे.

पारंपरिक प्रतिक्रियाशील दृष्टिकोन आता कालबाह्य झाले असून अधिक अंतर्ज्ञानी पध्दतींनी त्याला खूप मागे टाकले आहे. भविष्यसूचक देखभाल म्हणजे कोणत्याही संभाव्य समस्यांच्या मूळ कारणापर्यंत पोहोचणे, ते निकामी होण्याच्या वेळेचा अंदाज लावणे आणि यंत्र संचलन वेळ (अप-टाईम) वाढविणे.

महापारेषणने महाराष्ट्राच्या भौगोलिक लांबी आणि रुंदीमध्ये सुमारे ७१९ अतिउच्च दाब उपकेंद्रे (ईएचव्ही) आणि १३५१३४ एम.व्ही.ए. पारेषण क्षमतेसह हजाराहून अधिक रोहित्रांसह अ. उ. दा. पारेषण ग्रिडची स्थापना केली आहे. या अवाढव्य अशा पायाभूत सुविधांची सक्षमपणे देखभाल करण्यासाठी मालमत्ता व्यवस्थापन केंद्राची स्थापना केली जात आहे.

एमटीएएमसी प्रकल्प दूरस्थ एस.सी.ए.डी.ए. सोबत संपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापित करण्यासाठी लागू करण्यात आले आहे. त्याचबरोबर २४x७ व्हिडिओ पाळत ठेवणे आणि घुसखोरी शोध प्रणाली, संरक्षण आयईडीचे दूरस्थ मापदंडीकरण (रिमोट पॅरामीटरायझेशन) आणि केंद्रीकृत अडथळे विश्लेषण प्रणाली (सेंट्रलाइज्ड डिस्टर्बन्स ॲनालिसिस सिस्टम) सह संपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यासाठी लागू केले जात आहे. ऑनलाइन केंद्रीकृत अडथळे आलेख संकलन (सेंट्रलाइज्ड डिस्टर्बन्स रेकॉर्ड कलेक्शन) आणि संपत्तीचे रिमोट पॅरामीटरायझेशन सिस्टम रिस्टोरेशन प्रक्रियेत जलद निर्णय घेण्यासाठी विश्लेषणात जास्त मदतशीर सिध्द होणार आहे. हे सायबर सुरक्षा पैलूंशीही सुसंगत आहे.

विद्यमान हस्त संचलित आणि विकेंद्रित प्रणाली ही केंद्रीकृत स्वयंचलित प्रक्रियेने बदलली जात आहे. ही प्रक्रिया एस.सी.ए.डी.ए. नियंत्रण, स्वयंचलित बिघाड विश्लेषण प्रणाली, कॉर्पोरेट डेटा वेअरहाऊस प्रणाली, दृकश्राव्य सनियंत्रण (व्हिडिओ मॉनिटरिंग) आणि दूरस्थ मापदंडीकरण यामध्ये मदत करेल. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर खर्च, वेळ आणि संसाधनांच्या वापरामध्ये खूप सुधारणा होईल. ग्रिड संचालन राखण्याकरिता मनुष्यबळ, वेळ आणि वाहनांचा इष्टतम वापर हे सर्वात महत्त्वाचे पैलू आहेत. हा प्रकल्प महापारेषणमध्ये संपत्तीचे दूरस्थ निरीक्षण आणि त्याचे व्यवस्थापन सुलभतेने आणि कार्यक्षमतेने करेल. काही काळापूर्वी एम.टी.ए.एम.सी.च्या मदतीने ४०० के.व्ही. लोणीकंद उपकेंद्र आणि ४०० के.व्ही. पडघे उपकेंद्रातील ठिणगी पडण्याच्या घटना दूरस्थपणे पाहता आल्या होत्या.

महापारेषण कंपनी २४ ड्रोनचा उपयोग करून ५०३४९ सर्किट कि. मी. ची देखरेख करित आहे. ड्रोन हे परिस्थितीजन्य मूल्यांकन व प्रणालीच्या पुनर्प्रस्थापनाकरिता उपायात्मक कृतींच्या नियोजनात कार्यक्षम आहेत. अलीकडच्या काळात कराड परिमंडळात तौक्ते आणि निसर्ग चक्रीवादळाच्यावेळी हे ड्रोन पारेषण वाहिन्या (ट्रान्समिशन लाइन्स) आणि मनोऱ्याच्या स्थिती आणि मूल्यांकन करण्यासाठी कोणत्याही व्यत्ययाशिवाय कार्यरत होते. त्याव्दारे वेळेवर आणि सुरक्षित रितीने परिस्थितीचे नियोजन आणि पुनर्संचयन करण्यात खूप मदत झाली आहे.



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

जवळ असलेल्या प्रत्येक मनोऱ्यावर जाण्याची गरज आता राहिलेली नाही. ड्रोनव्दारे गस्त घातला जात आल्याने 'युटिलिटी' कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेत वाढ झालेली आहे आणि मनुष्यबळाच्या वापरात सुधारणा झाली आहे. तपासणी आणि गस्त घालण्याचा खर्च कमी तर झालेला आहेच, पण चुकांची शक्यताही जवळपास नगण्य झालेली आहे. शासकीय कंपनी असल्याने आपला 'कर्मचारी सहभागा' च्या महत्त्वावर पूर्ण विश्वास आहे. मला याची जाणीव आहे की, एक मोठी कंपनी म्हणून आपण ज्या समाजात काम करत आहोत, त्या समाजाप्रती आपली जबाबदारी आहे आणि आपण सकारात्मक काम करण्यासाठी वचनबध्द आहोत. कर्मचारी सहभागाच्या क्रियाकलापातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे "आरोग्य आणि निरोगीपणाला प्रोत्साहन देणे", (Health and Wellness) हा होय. कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात वृध्दी करण्यासाठी मुंबई येथील सांघिक कार्यालयात वाचनालय (Library) सुरु करण्यात आले आहे. सी.बी.आय.पी. मॅन्युअल्स आणि जगभरातील ऊर्जा क्षेत्रातील नवीनतम नियतकालिकांव्यतिरिक्त अन्य पुस्तकांची विस्तृत श्रेणी याठिकाणी आहे. 'निरोगी कर्मचारी म्हणजेच अधिक उत्पादकता' हे ब्रीद आपल्याला समजले आहे आणि म्हणूनच आपल्या कर्मचाऱ्यांना व्यायामशाळा (Gym) व ध्यानधारणा केंद्राची (Meditation Centre) सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधांचा विस्तार पुढील काळात विभागीय स्तरावर करण्याचा मानस आहे. खुल्या जिमचा प्रस्ताव आगामी वर्षापासून प्राधान्याने घेतला जाईल. ही जिम आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे आणि आपल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला मार्गदर्शन करणारे प्रशिक्षित मार्गदर्शक आणण्याची कंपनीची योजना आहे.

येणाऱ्या उन्हाळ्याच्या महिन्यांत विजेचा भार वाढण्याची शक्यता आहे. त्यानुसार भविष्यातील संभाव्य वीजभाराची पूर्तता करण्यासाठी नियोजित पारेषण प्रणाली उभारण्यासाठीची योजना पूर्ण करण्यासाठी तयारी करावी लागेल. प्रणालीची दाटी टाळण्यासाठी प्रकल्प वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, माझे अधिकारी व कर्मचारी पूर्ण सुधारणा आणि संघटनात्मक दृष्टीने काम करतील आणि सर्वांसाठी उत्तम असे भविष्य निर्माण करण्यात यशस्वी होतील.

**शुभेच्छांसह..!**

– दिनेश वाघमारे
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

Good News

▶ स्कॉच पुरस्काराची नवी दिल्लीत घोषणा

# दुर्गम भागात ड्रोनच्या वापरासाठी महापारेषणला सिल्व्हर पारितोषिक



Follow us on :

नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ७६ व्या स्कॉच पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यामध्ये 'पॉवर आणि एनर्जी' या विभागांतर्गत 'ईएचव्ही लाईन पॅट्रोलिंगमध्ये ड्रोनचा उपयोग' यासाठी महापारेषणला राष्ट्रीय स्तरावर सिल्व्हर पारितोषिकाची घोषणा झाली. महापारेषण कंपनीने दुर्गम भागातही ड्रोनच्या सहाय्याने वीजपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी व विजेचे वहन करण्यासाठी याचा वापर केला आहे. या पारितोषिकाबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

स्कॉच ग्रुपच्या वतीने दरवर्षी शासन, अर्थ, बँकिंग, तंत्रज्ञान, सांघिक नागरिकत्व, आर्थिक या क्षेत्रातील वाढीसाठी हा पुरस्कार दिला जातो. महापारेषणच्या वतीने नामांकन भरून सदर पुरस्कार गुणांकन पध्दतीने मिळविला आहे.



या पुरस्काराबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे म्हणाले,``महापारेषणच्या यशाचे श्रेय मी माझ्या टीमला देतो. अधिकारी व कर्मचारी यांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे महापारेषणला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली आहे. त्यामुळे भविष्यातही महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी चांगले काम करतील.``

महापारेषणमधील अति उच्च दाब वाहिनी आणि उपकेंद्रांचे स्कॅनिंग व देखरेख करण्यासाठी २४ ड्रोन वापरात आहेत. हे ड्रोन हाय रेझोल्यूशन, सामान्य व्हिजन व थर्मोव्हिजन कॅमेरा तसेच जीपीएस यंत्रणेसह सुसज्ज आहेत. ड्रोन मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक देखभाल हेतूसाठी वापरले जात आहेत. विशेष म्हणजे अशा ठिकाणी जेथे कंडक्टर/टॉवर ॲक्सेसरीज/हार्डवेअर फिटींगची दृश्यमानता योग्य नसते. यामुळे अति उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांचे निरीक्षण कमी वेळेत पण अधिक अचूकपणे करता येते. परिणामी, अति उच्च दाब वाहिनी आणि उपकेंद्रांमधील बिघाड कमी वेळेत दूर केले जातात व उच्चतम उपलब्धता राखली जाते.

महापारेषण मधील सर्व अति उच्च दाब (संचलन व सुव्यवस्था) मंडळ व परिमंडळ कार्यालयात ड्रोन यंत्रणेचा वापर करण्यात येत आहे. हा प्रकल्प विशेष लक्षणीय आहे. परीक्षकांनी सदर उपक्रमाबद्दल महापारेषणचे कौतुक केले.

---

नियुक्ती

# महापारेषणच्या संचालक (संचलन) पदाचा कार्यभार श्री. संदीप कलंत्री यांच्याकडे

Follow us on :

श्री संदीप कलंत्री यांच्याकडे दि. १६.१२.२०२२ पासून संचालक (संचलन) या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. श्री. कलंत्री यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथून विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आहे. ते तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात १९९७ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झाले.



तद्नंतर ते २००७ साली थेट भरतीमध्ये उपकार्यकारी अभियंता या पदावर रुजू झाले. तसेच २००९ साली झालेल्या थेट भरतीमध्ये अधीक्षक अभियंता या पदावर रुजू झाले. २०२१ मध्ये त्यांची मुख्य अभियंता या पदावर पदोन्नती झाली आहे.

श्री. कलंत्री यांनी आय.आय.एम, इंदौर (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट) येथून कार्यकारी व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यांना चाचणी, संचलन व व्यवस्था, ईआरपी, खरेदी, एच.व्ही.डी.सी., अभिकल्प इत्यादी कामाचा अनुभव आहे.

श्री. कलंत्री यांनी एनपीआयटी, बेंगळुरू येथून ईएचव्ही लाईव्ह लाईन मेंटेनन्स या विषयातील ०३ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी खूप-खूप शुभेच्छा!

---

आमच्याशी कनेक्टेड रहा

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco

नवे वर्ष, नवे संकल्प

वरिष्ठ अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी व दिनदर्शिका-२०२३ चे थाटात प्रकाशन

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वार्षिक दैनंदिनी, प्लॅनर व दिनदर्शिका-२०२३ चे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, श्री. पीयूष शर्मा, श्री. भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मासं. आस्थापना) श्री. अभय रोही, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, उपव्यवस्थापक (मा.सं.) श्री. लोटन वळवी उपस्थित होते.

सुरवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी नववर्षाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संदेश दिला. गेल्या वर्षात राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे आणि अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी, स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता व विधी या विभागांनी आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करून महत्त्वाची भूमिका बजावली. अशाच प्रकारे यावर्षी देखील आपल्या विभागाची जबाबदारी पार पाडल्यास पर्यायाने कंपनीच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहील. कोणत्याही कामात तीन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. त्यातील पहिली म्हणजे जीवनामध्ये निरंतर सुधारणा अत्यावश्यक आहे. ती सुधारणा आपण केली पाहिजे. दुसरे म्हणजे कायम नवीन शिकणं आवश्यक आहे. त्याचबरोबर सकारात्मकता ठेवायला हवी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार व्यवस्थापक (मा.सं.) तथा संचालक (मा. सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर यांनी केले.



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी, प्लॅनर व दिनदर्शिका-२०२३ चे प्रकाशन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, शेजारी संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी व अन्य वरिष्ठ अधिकारी.



## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे डिसेंबर २०२२-जानेवारी-२०२३

| | अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| नियुक्ती | १ | पीयूष शर्मा | मुख्य अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | १९.१२.२०२२ |
| | २ | सुनील शेरेकर | मुख्य अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | १६.१२.२०२२ |
| | ३ | अविनाश निंबाळकर | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, औरंगाबाद | १६.१२.२०२२ |
| | ४ | महेश भागवत | मुख्य अभियंता (पारेषण) | राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | १६.१२.२०२२ |
| | ५ | नागसेन वानखेडे | मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.०१.२०२३ |
| निवृत्ती | अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| | १ | श्री. अविनाश कसबेकर | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | स्थापत्य मंडळ, नागपूर | ३१.१२.२०२२ |

▶ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

# दैनंदिन व्यवहारातही मराठी भाषेचा वापर करा : श्री. दिनेश वाघमारे

Follow us on :

``शासकीय कामकाजाबरोबरच दैनंदिन व्यवहारातही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेचा जास्तीत-जास्त वापर करावा. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा``, असे प्रतिपादन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी वांद्रे येथील प्रकाशगड इमारतीच्या सभागृहात आयोजिलेल्या बक्षीस वितरण समारंभात श्री. दिनेश वाघमारे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, मराठी भाषा समन्वय अधिकारी श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. अभय रोही उपस्थित होते.

श्री. दिनेश वाघमारे पुढे म्हणाले, ``मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी दैनंदिन जीवनातही मराठीचा वापर करावा. मराठी भाषेच्या प्रसारासाठी महापारेषणने निबंध स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, एकपात्री स्पर्धा, परिसंवाद आयोजित केला, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. विविध कलागुणांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना वाढीस लागते.``

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी मानव संसाधन विभागांनी आयोजिलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. महेश आंबेकर व श्रीमती स्मिता वंजारी यांनी केले. श्री. नितीन कांबळे यांनी आभार मानले.




**महापारेषणच्या मुंबई :** महापारेषणने वांद्रे येथे आयोजिलेल्या विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी विजेत्यांसमवेत महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.), संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, श्री. सुधीर वानखेडे, श्री. कैलास कणसे, श्री. सुनील शेरेकर, श्री. राजू गायकवाड, श्री. मंगेश शिंदे, श्री. भरत पाटील, श्री. नितीन कांबळे.




मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महापारेषणच्या महिला कर्मचाऱ्यांनी आकर्षक रांगोळी काढली.




**मुंबई :** महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी निवेदकाच्या भूमिकेत जाऊन मराठी भाषेविषयी माहिती सांगितली.

### निकाल पुढीलप्रमाणे :

निबंध लेखन स्पर्धा-विनय खेडेकर (प्रथम), अनिल सोनावणे (व्दितीय), विशाखा भोसले (तृतीय), रूपेश गजरे (उत्तेजनार्थ). काव्यवाचन स्पर्धा- विशाल वाघचौरे (प्रथम), सुशील घाडगे (व्दितीय), स्मिता वंजारी (तृतीय), आनंद दळवी (उत्तेजनार्थ). एकपात्री अभिनय सादरीकरण-राजू गायकवाड (प्रथम), स्मिता वंजारी (व्दितीय), सुशील घाडगे (तृतीय), भारती कांबळे (उत्तेजनार्थ). परिसंवाद-विनय खेडेकर व सुशील घाडगे (प्रकाश सरिता, विजेता गट)

आम्ही आता लाइव्ह आहोत!

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

**माझी भाषा, माझी बोली**

▶ प्रा. संतोष बोंगाळे व डॉ. हिमांशू स्मार्त यांचे व्याख्यान

# कराड परिमंडळात मराठी भाषा पंधरवडा उत्साहात साजरा




**कोल्हापूर :** कराड परिमंडळांतर्गत असणाऱ्या कोल्हापूर येथे मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. चिदाप्पा कोळी श्री. प्रांजल कांबळे, श्री. अतुल मनुरकर व अधिकारी.

Follow us on :

कराड परिमंडळांतर्गत असणाऱ्या कोल्हापूर येथे मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला.

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामधून मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, या हेतूने दरवर्षी दिनांक १४ जानेवारी ते दिनांक २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात येतो. दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे. रोज एक नवीन शब्द शिकावा, असे सौ. शिल्पा कुंभार यांनी सांगितले.

वेणूताई चव्हाण महाविद्यालय, कराडचे प्रा. संतोष शाहू बोंगाळे यांचे व्याख्यान झाले. तसेच २२० के. व्ही. उपकेंद्र, नेर्ले येथे कार्यरत असलेले अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. जगन्नाथ पवार यांनी मराठी भाषेतील मुळाक्षरांची माहिती रंजक पध्दतीने देऊन त्याचे महत्त्व सांगितले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. हिमांशू भूषण स्मार्त यांचे मराठी भाषेविषयी व्याख्यान झाले. यावेळी डॉ. स्मार्त यांनी मराठी भाषा संवर्धन व वृध्दी याबाबत आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री. चिदाप्पा कोळी, अधीक्षक अभियंता श्री. प्रांजल कांबळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अतुल मनुरकर तसेच सर्व कार्यकारी अभियंता, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.)/(विवले) व सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

**भाषा जनाची, भाषा मनाची**

▶ व्याख्यान, गीतगायन, काव्यवाचन, प्रश्नमंजूषा, हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन

# वाशी परिमंडळात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

Follow us on :

वाशी परिमंडळ कार्यालय तसेच वाशी परिमंडळांतर्गत विविध मंडळ कार्यालये आणि विभागीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वाशी परिमंडळ कार्यालयाने वक्तृत्व, काव्यवाचन व प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन केले होते. त्याला कर्मचाऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. वाशी परिमंडळातील अउदा संवसु मंडळ कळवा आणि अउदा संवसु प्रकल्प मंडळ, कळवा यांनी संयुक्तरित्या `कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर` या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. मराठी गीतांची अंताक्षरी, गीतगायन, काव्यवाचन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अउदा संवसु मंडळ, पनवेल कार्यालयाने मराठी निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा, काव्यवाचन, कथाकथन, मराठी गीतांची अंताक्षरी, मराठी म्हणी आदी कार्यक्रम सादर केले.

अउदा स्थापत्य बांधकाम-नि-सुव्यवस्था मंडळ, ऐरोली कार्यालयाने उपविभागात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हस्ताक्षर व शुध्दलेखन स्पर्धा घेतल्या. मराठी अभिवाचन स्पर्धा, मराठी गीतांची अंताक्षरी कार्यक्रमात कर्मचाऱ्यांनी मोठा सहभाग नोंदविला.

वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी सर्व कर्मचाऱ्यांना मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त शुभेच्छा देत दैनंदिन कार्यालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेचा जास्तीत-जास्त वापर करावा. तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, या दृष्टीने प्रत्येक कर्मचाऱ्याने प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व अधीक्षक अभियंता, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.विवले), कार्यकारी अभियंता, व्यवस्थापक (मा.सं.विवले), उपव्यवस्थापक (मा.सं./विवले) तसेच विविध कार्यालयातील तांत्रिक/मा.सं./विवले विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**वाशी :** परिमंडळात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांच्यासह अधिकारी व कर्मचारी वर्ग.

# प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...





**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग.

# महापारेषणमध्ये ७४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

Follow us on :

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## संविधान आहे महान, सर्वांना हक्क समान

## अधिकाऱ्यांनी केले संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

# महापारेषणमध्ये संविधान दिवस उत्साहात साजरा

Follow us on :

येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयात संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. मनोहर बागले, उपव्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती भारती कांबळे, सहाय्यक लेखापाल श्री. धनंजय खरात, उपव्यवस्थापक (विवले) श्री. नवनाथ गायकवाड, श्री. सुनील गडलिंग यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**मुंबई :** येथील सांघिक कार्यालयाच्या वतीने संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, कार्यकारी अभियंता श्री. सचिन खडगी व अन्य अधिकारी, कर्मचारी वृंद.

प्रज्ञासूर्याला विनम्र अभिवादन!



मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त महापारेषणमध्ये सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.



मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर. शेजारी संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी.

▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी अभिवादन

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ``भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार सर्वांनी आचरणात आणले तर खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.``, असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. संजीव भोळे, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. नितीन कांबळे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुंबई : महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त नागरिकांना मोफत पाणीवाटप करण्यात आले. याप्रसंगी नागरिकांना पाणीवाटप करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, शेजारी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, श्री. संदीप धाबर्डे, श्री. शैलेंद्र दुर्गे, श्री. महेश आंबेकर, श्री. पंकज बोरकर यांच्यासह विविध अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

Like Comment Share MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

## वंदन ज्ञानज्योतीला...





**मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर. शेजारी संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे.

### ▶ महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मा. सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (विवले) श्रीमती अंजू गुप्ता, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. महेश सावंत, कार्यकारी अभियंता श्री. सचिन खडगी यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी संचालक (संचलन) (प्र.) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा. सं.) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर माहिती सांगितली.

यावेळी श्रीमती भारती कांबळे, कीर्ती देशमुख, वृषाली राऊत यांनीही आपले विचार मांडले.

### सावित्रीच्या लेकी



**मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महापारेषणच्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्रित असा फोटो घेतला.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.**, Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.